
मुक्तीचे गीत

नेल्सन मंडेलांची संघर्षकथा

लेखन: नील टाँज

चित्र: टोनी मोरिस

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक



मुक्तीचे गीत

नेल्सन मंडेलांची संघर्षकथा



लेखन: नील टाँज

चित्र: टोनी मोरिस

मराठी अनुवाद: तृप्ती कर्णिक

१९१८: नेल्सन मंडेला यांचा ट्रांसकाई, दक्षिण आफ्रिका इथे १८ जुलैला जन्म

१९३९: फोर्ट हेर महाविद्यालयात प्रवेश

१९४२: विट्सवॉटरसँड महाविद्यालयात वकिलीचे शिक्षण घेण्यासाठी प्रवेश

१९४३: एएनसी-आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसच्या स्थापेनेसाठी मदत

१९५१: वकिलीचे शिक्षण पूर्ण

१९५६: पाच वर्षांनंतर त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल

१९६०: शार्पविल नरसंहार

१९६१: अटक आणि लगेचच सुटका. त्यानंतर वर्षभरातच १९६२ मध्ये पुन्हा अटक आणि तुरुंगात रवानगी

१९९०: ११ फेब्रुवारीला तुरुंगातून सुटका

१९९४: दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात पहिल्या खुल्या व निष्पक्ष निवडणुकीनंतर नेल्सन मंडेला ह्यांची राष्ट्रपतीपदावर निवड

२०१३: ५ डिसेंबर रोजी मृत्यू

ते चुकून झाले होते



"सियाबोंगा!"

सियाबोंगाने फुलाच्या बागेची खुरपणी थांबवून वर पाहिले. भर दुपारची वेळ होती. प्रखर उन्हाच्या झळा डोळ्यांना लागू नये म्हणून त्याने कपाळावर हात ठेवला होता.

"बघ तरी मी काय आणले आहे!" डॉ. होप-सियाबोंगाच्या मालकांचा दहा वर्षाचा मुलगा क्रिस गवतावर उडणाऱ्या कारंज्याचे पाणी चुकवत हिरवळीवरून पळत येत होता. कारंज्यातील तुषार मोत्यासारखे चमकत होते.



क्रिसचा चेहरा आनंदाने फुलला होता. त्याने त्याचा नवीन कॉम्पुटर गेम सियोबोंगाच्या हातात दिला आणि म्हणाला. “कसा वाटला तुला हा गेम? छान आहे ना?”

सियाबोंगाने घाईने हातातील कुदळ बाजूच्या नीलमोहरच्या झाडाखाली ठेवली. आणि तो उत्सुकतेने क्रिसच्या हातातील गेम पाहू लागला.

“छोटे मालक, मी काम थांबवणे योग्य नाही. मोठ्या मालकांनी जर पाहिले तर ते रागावतील. सियाबोंगा क्रिसपेक्षा फक्त तीन वर्षांनी मोठा होता. पण क्रिस दक्षिण आफ्रिकेतील एका श्रीमंत गोऱ्या कुटुंबातील मुलगा होता तर सियाबोंगा जोहान्सबर्ग शहराबाहेरच्या एका गरीब काळ्या वस्तीतील मुलगा होता.




"अरे, फक्त एक मिनिट पकड. कुणाला काही कळणार नाही," क्रिस आग्रहाने म्हणाला.

सियाबोंगाने आजूबाजूला पाहिले. कुणीही नजरेच्या टप्प्यात दिसत नव्हते. आणि असेही निलमोहराच्या मागे दोघेही सहज लपू शकणार होते. सियाबोंगाची बोटे थरथरली. असे काही घ्यायचे त्याने म्हटले तर त्यासाठीचे पैसे जमा करायला त्याला कैक महिने काम करावे लागले असते. परंतु त्याच्या आईला त्याच्या पगाराची खूप गरज होती. ती अलेक्झांड्राच्या वस्तीत एका छोट्याशा पत्र्याच्या घरात राहत होती.

‘क्रिस, हे कसे खेळायचे असते?” सियाबोंगाने आपल्या छोट्या मित्राला विचारले.

“अरे, ही बटणे अशी फक्त दाब बस,” क्रिस उत्साहाने म्हणाला. आणि तो गेम सियाबोंगाच्या हातातून घेऊ लागला. त्या गडबडीत तो गेम सियाबोंगाच्या हातातून खाली पडला. रस्त्यावर पडल्यामुळे त्या गेमचे तुकडे झाले. भीतीने दोन्ही मुले मागे वळली.



त्या तुटलेल्या गेमकडे ते घाबरून पाहत असतानाच झुडुपाच्या मागून क्रिसच्या बाबांची हाक ऐकू आली. पत्रांचा गठ्ठा घेऊन घराकडे येत असताना त्यांना वस्तू तुटल्याचा आवाज आला.

“क्रिस! इकडे काय करतो आहेस?” त्यांनी खाली पडलेल्या तुटक्या कॉम्पुटर गेमकडे नजर टाकली आणि मग सियाबोंगाच्या चेहऱ्याकडे पाहिले.

“बाबा, बाबा हे चुकू...” क्रिसने काय झाले आहे ते सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न केला परंतु बाबांनी त्याला घरी जाण्यासाठी दरडावले.

“क्रिस, तुझ्याशी मी नंतर बोलेन. ह्याआधीही मी तुला अनेक वेळा सांगितले आहे की सियाबोंगाला इथे काम करण्याचे पैसे मिळतात तुझ्याशी खेळण्यासाठी नाही.”

क्रिसने मान खाली वळवली. ते तुटलेले खेळणे उचलून तो खिन्नपणे घराकडे चालू लागला आणि अंगणाभोवती असेलेल्या झाडाच्या सावलीत हळूहळू गायब झाला.





डॉ. एलन होपनी आता मोहरा सिंयाबोंगाकडे वळवला. त्यांचा चेहरा रागाने लाल झाला होता.

‘‘सियाबोंगा, मला तुझा प्रचंड राग आला आहे. मी तुला आणि तुझ्या काकांना इकडे मजुरीसाठी ठेवले आहे. त्याचे मी तुम्हाला वेळच्या वेळी पैसे देतो. तुला आता कामावर ठेवायचे की नाही हे मला ठरवायला लागेल. हे काही पहिल्यांदा नाही घडले आहे.”

सियाबोंगाजवळ बोलण्यासारखे काहीच नव्हते. क्रिसचे बाबा खूप संतापले होते. आता काही जरी त्याने बोलण्याचा प्रयत्न केला असता तर त्याचीच नाही तर त्याच्या काकांचीही नोकरी गेली असती.

‘‘माफ़ करा मालक. मी मुद्दाम नाही केले हे,” मान खाली झुकवून सियाबोंगा म्हणाला. मालकाकडे मान वर करून बघण्याची त्याच्याकडे हिंमत नव्हती.

“मला हे मुळीच पसंत नाही. पुढे काय करायचे ह्याचा निर्णय मी लवकरच घेईन.” सियाबोंगाने हळूच डोळ्याच्या कोपऱ्यातून मालकाच्या चेहऱ्यावर माफ केल्याचे काही भाव आहेत का हे पाहिले. परंतु त्याचा काहीही मागमूस नव्हता.



प्रकरण २

काहीतरी चांगले घडेल



सियाबोंगा आपल्या जोशुवाकाकांकडे एकटक पाहत होता. ते त्यांच्या अरुंद खोलीत एका फळकुटावर दु:खी चेहऱ्याने बसले होते.

“मला माफ करा काका, पण खरे तर माझी काहीच चूक नव्हती.”


काका वैतागले होते. इथली नोकरी टिकवणे त्यांच्यासाठी खूप महत्वाचे होते. त्यांनी पन्नाशी गाठली होती त्यामुळे परत नवीन नोकरी मिळण्याची शक्यता खूप कमी होती.

“हे बघ सियाबोंगा, तुला तर माहित आहेच की चूक नेहमी काळ्या लोकांचीच असते. गोरे लोक नेहमी बरोबर असतात. आहे हे असेच आहे.”

सियाबोंगाने मान हलवली. आपले आयुष्य इतके का वाईट आहे हा विचार त्याला सहन होत नव्हता.

जोशुवाकाका थोडे नरमले. सियाबोंगा उदास झाला आहे हे त्यांना दिसत होते परंतु कामावरून काढून टाकण्याची भीती काही केल्या जात नव्हती.

“असो..कदाचित उद्यानंतर...काही बदल होतील.”





त्याला मंडेलांच्या संघर्षाची गोष्ट तोंडपाठ होती. पण ती पुन्हापुन्हा ऐकायला त्याला कधीच कंटाळा येत नसे.

“काका, मला मंडेलांची गोष्ट पुन्हा सांगा ना.”

जोशुवानी बिछान्यावर अंग टाकले आणि हात डोक्यामागे टेकवले.

“उद्या? उद्यापासूनच का?” सियाबोंगा गोंधळात पडला. मग त्याला आठवले की काळ्या लोकांचे नेते नेल्सन मंडेला अठ्ठावीस वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर कारावासातून बाहेर येणार होते.

त्या विचारानेच सियाबोंगाला तरतरी आली. गोष्टी नक्की बदलतील. एकदा का मंडेलांची सुटका झाली की गोरा-काळा भेद संपुष्टात येईल. आणि मग दक्षिण आफ्रिकेमध्ये सगळ्यांना समान वागणूक मिळेल.



प्रकरण ३


मुखियाचा मुलगा



"तुला माहित आहे का, नेल्सन मंडेला काही सामान्य घरातील मुलगा नव्हते," जोशुवानी बोलायला सुरुवात केली. "१९०८मध्ये त्यांचा जन्म ट्रान्सकाईमधील एका मोठ्या समूहाच्या सरदाराच्या घरात झाला होता. जरी ते सरदार घरातील असला तरीसुद्धा सामान्य घरातील मुलांप्रमाणे त्यांनाही गुरे सांभाळावी लागत, मेंढ्या चरायला न्याव्या लागत आणि शेताची कामेही करायला लागायची.

सियाबोंगा डोळे मोठे करून म्हणाला, "काय! मुखियाचा मुलगा असून देखील त्यांचे आयुष्य सोपे नव्हते!"

जोशुवा त्यावर क्षणभर हसले आणि पुन्हा गंभीर चेहऱ्याने पुढील गोष्ट सांगू लागले. "नेल्सन जेव्हा फक्त बारा वर्षांचे होते तेव्हा त्यांचे आयुष्य बदलून गेले. त्यांचे बाबा खूप आजारी झाले. मृत्युच्या आधी त्यांनी त्यांच्या प्रमुखांना आपल्या मुलाची देखभाल करण्याची जबाबदारी सोपवली. आपल्या मुलातील विशेष नेतृत्व गुण त्यांच्या पारखी नजरेने हेरले होते.





प्रमुखांनी नेल्सनना मिशनरी शाळेत घातले. तिथे गेल्यावर नेल्सनना सर्वप्रथम समजले की दक्षिण आफ्रिकेवर फक्त गोऱ्यांची सत्ता चालते.

शाळेतील इतिहासाच्या पाठ्यपुस्तकामध्ये फक्त गोऱ्या नेत्यांची वर्णने होती. आणि काळे? त्यांना तर सुधारण्यासाठी खूप काही करावे लागणार होते. सतराव्या शतकात ब्रिटीश आणि डचांनी आफ्रिकेतील ह्या भागावर आक्रमण करून काळ्या जनतेवर राज्य मिळवले होते.

काळानुसार गोरे सरकार अधिकाधिक कट्टर बनले होते. काळे लोक फक्त मजूर आणि नोकर राहावेत ह्यासाठी त्यांनी अनेक कडक कायदे संमत केले होते. काळ्या लोकांना इतरत्र फिरण्यावर निर्बंध घातले होते आणि त्यांना जबरदस्तीने गावाबाहेरच्या वस्तीत डांबले होते.


“पण काका, हे तर आताही असेच आहे,” सियाबोंगाने त्यांच्या बोलण्यात व्यत्यय आणला.

“हो, आताही असेच आहे पण आशा करूयात की हे जास्त दिवस नाही राहणार,” जोशुवा जोराने मान हलवत म्हणाले.





जेव्हा ते घरी परत आले तेव्हा प्रमुख त्यांच्यावर खूप रागावले. त्यांनी असे मोर्चे काढणे बंद करण्याचा आदेश दिला. नेल्सननी त्या गोष्टीला ठाम नकार दिला. त्यावर प्रमुखांनी त्यांचे लग्न लावून देण्याचे ठरवले. तेव्हा मात्र नेल्सन जोहान्सबर्गला पळून गेले.



तिथल्या पुस्तकांत जे लिहिले होते ते नेल्सनना पटत नव्हते तरीही त्यांची शाळेतील प्रगती उत्तम होती. नंतर पुढील शिक्षणासाठी त्यांनी फोर्ट हेअर महाविद्यालयात प्रवेश घेतला. पण ह्या बदलत्या गोष्टी त्यांना खटकत होत्या. काही दिवसातच काळ्या लोकांना अन्यायकारक वागणूक दिली जाते त्याविरोधात त्यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. त्यामुळे ते अडचणीतही आले.

सर्वात प्रमुख सरदाराचा निर्णय जुमानला नाही हे ऐकून सियाबोंगाला धक्काच बसला. “अशा वागण्याची त्यांना नक्की शिक्षा मिळाली असेल,” तो श्वास रोखून म्हणाला.

“हो तर!” जोशुवाने उत्तर दिले. “प्रमुख त्याच्यावर खूप रागावले. परंतु आपल्या मनाला पटत नसलेली कुठलीही गोष्ट करणे नेल्सनना मान्य नव्हते. परंतु त्यांना हे नक्कीच माहित होते की संघर्षाची आता कुठे सुरुवात आहे.”

“आपल्या सगळ्या काळ्या लोकांसारखेच नेल्सननाही काम करण्यासाठी, शहरात राहण्यासाठी तसेच प्रवास करण्यासाठी परवाना लागत होता. आयुष्य खडतर होते. मंडेला चांगले उंच आणि धिप्पाड होते. त्यांना सोन्याच्या खाणीमधे सुरक्षारक्षकाची नोकरी मिळाली. अलेक्झांड्रा इथे आपल्या लोकांसाठीच्या वस्तीत रहात असताना त्यांची वाल्टर सिसुलू ह्यांच्याशी गाठ पडली. पुढे जे त्यांचे कायमचे मित्र बनले. त्यांनी नेल्सनना कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी मदत केली.



प्रकरण ४

खटला



सियाबोंगाने डोळे चोळले. तो खरंतर खूप दमला होता. परंतु आपल्या नेत्याबद्दल त्याला आणखीन ऐकण्याची उत्सुकता होती. "त्यांनी कसा संघर्ष केला काका?" त्याने उत्सुकतेने विचारले. "ते आपले नेते कधी आणि कसे बनले?"


जोशुवाही खूप दमले होते पण आपल्या पुतण्याला हे सगळे माहित असावे असेही त्यांना वाटत होते.

''वकील झाल्यावर नेल्सन शांत बसू नाही शकले. ते व त्यांचा विद्यार्थी मित्र ऑलिवर थाम्बो आफ्रिकन नॅशनल काँग्रेसमधे (एएनसी) सामील झाले. दक्षिण आफ्रिकेतील काळ्या लोकांना चांगली वागणूक मिळावी ह्यासाठी एएनसी लढा देत होती. ते जेव्हा आपले नेता बनले तेव्हा आपली परिस्थिती आणखीनच हलाखीची झाली होती. सरकारला काळे आणि गोरे ह्यांना पूर्णपणे वेगळे करायचे होते. ह्याला "वर्णभेद" असे म्हणतात.



''नेल्सन आणि एएनसीच्या इतर नेत्यांचा वर्णभेदाला विरोध होता. कारण त्यामुळे काळ्या लोकांना काही भागांमध्ये राहण्याची मनाई होती, त्यांना मतदानाचा अधिकार नव्हता तसेच गोरी मुले असलेल्या शाळांमध्ये काळ्या मुलांना परवानगी नव्हती. एवढंच नाही तर त्यांची आणि आपली दुकाने वेगळी अगदी बागांमधील बाके सुद्धा वेगळी होती.

''नेल्सन आणि इतर नेत्यांनी त्याविरोधात अनेक निदर्शने केली विशेषतः परवाना कायद्याच्या विरोधात. जोहान्सबर्गमध्ये नेल्सन ह्याचे भाषण संचारबंदी सुरु झाल्यानंतरही रात्री ११ वाजेपर्यंत चालू होते. (संचारबंदी सुरु झाल्यावर आपल्यासारख्या काळ्या लोकांना बाहेर पडण्यासाठी विशेष परवाना घ्यावा लागत असे.) तिथून ते बाहेर पडल्यावर त्यांच्या सर्व समर्थकांना पोलिसांनी अटक केली.





“निकोसी सिकलेली आफ्रिका” (ईश्वर आफ्रिकेला स्वातंत्र देवो) हे एएनसीचे राष्ट्रगीत गात समर्थक पोलिसांच्या गाडीत बसून कारागृहात गेले. पहिल्या चार महिन्यात ८५०० लोकांना तुरुंगात डांबण्यात आले. त्यांच्यामध्ये काही गोरे लोकही होते. त्यांचा ह्या निदर्शनाला पाठींबा होता. ह्या घटनेने एएनसीचे काम सर्वदूर पोचले. हजारो लोक एएनसीत सामील झाले.

“आता त्यांच्यावर पोलिसांची करडी नजर होती,” जोशुवा आठवत म्हणाले. “सुरुवातीला त्यांनी नेल्सन ह्यांना घरातच नजरकैद केले. त्यांना बाहेर जाण्यास सक्त मनाई होती. तसेच एकावेळी एकाच व्यक्तीला भेटण्याची त्यांना परवानगी होती.

आणि ५ डिसेंबर १९५६ च्या पहाटे त्यांच्या घराच्या दारावर जोराची थाप पडली.

“दार उघडा...पोलीस आहोत!”





“म्हणजे काय?” सियाबोंगाने विचारले.

“म्हणजे खटला चालू असताना नेल्सन घरी राहू शकले,” काकांना त्याला समजावून सांगितले.

“त्यामुळे खटला चालू असताना नेल्सन ह्यांचे एएनसीचे काम सुरु ठेवू शकले. ते नेहमी म्हणत की एएनसीचा हा लढा गोऱ्या लोकांविरुद्ध नाही तर अन्यायकारक कायद्याच्या विरोधात आहे. आणि हा लढा अहिसक व शांततेच्या मार्गाने सुरु राहील.”

“संपूर्ण दक्षिण आफ्रिकेतील शेकडो काळ्या-गोऱ्या स्त्री-पुरुषांना अटक करण्यात आली. त्यातील एएनसीच्या काही नेत्यांसह १५० जणांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला. देशद्रोहाची शिक्षा होती फाशी!

“जोहान्सबर्गमध्ये जेव्हा हा खटला सुरु झाला तेव्हा रस्त्यावर लाखो समर्थक मुक्तीचे गीत गात असत. सरकारने ह्या खटल्यावर नीट अभ्यास केला नव्हता. नेल्सन आणि इतर कैद्यांची जामिनावर सुटका झाली.”



प्रकरण ५

लढा



जोशुवानी आपले दुखरे अंग लोखंडी बाजेवर टेकवले. गोष्ट आता शेवटाला आली होती.

हा खटला जवळजवळ चार वर्षे सुरु होता. त्यामुळे संपूर्ण जगाला मंडेला आणि इतर एएनसीच्या कामाबद्दल कळले. ब्रिटनचे पंतप्रधान हॅरोल्ड मॅकमिलन फेब्रुवारी १९६० मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या दौर्यावर आले होते. संपूर्ण आफ्रिकेमध्ये “बदलाचे वारे” वाहत आहेत हे त्यांचे वक्तव्य ऐकून तेथील गोऱ्या लोकांना धक्का बसला.

“आणि त्यांनतर काहीच आठवडे उलटले असतील. शार्पविले ह्या जोहानसबर्गच्या उत्तरेला असलेल्या शहरात पोलिसांनी काळ्या लोकांवर बेछुट गोळीबार केला. परवाना कायद्याच्या विरोधात ते लोक शांततेने निदर्शने करीत होते. तो आपल्या लोकांसाठी अतिशय वाईट दिवस होता. त्यात ६९ लोक मृत्युमुखी पडले तर २०० लोक जखमी झाले. त्यात बहुतांशी स्त्रिया आणि लहान मुले होते. त्या हत्याकांडाच्या ठिकाणाहून पालक आपल्या मृत मुलांना उचलून नेत आहेत ह्याचे फोटो जगभरातील वर्तमानपत्रात पहिल्या पानावर छापून आले.





“सतरा महिन्याच्या कालावधीनंतर ५ महिन्याने त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

शिक्षा सुनावण्याआधी न्यायाधीशांनी त्यांना बोलायला परवानगी दिली. ते जवळजवळ चार तास बोलत होते. समजुती, लढा ह्यावरील त्यांचे शब्द पूर्ण जग त्यांचे भाषण काळजीपूर्वक ऐकत होते. ते तेव्हा काय म्हणाले ह्यातील शब्दनशब्द मला आठवतोय.”

“साडेचार वर्षानंतर २९ मार्च १९६१ मध्ये एकदाचे मंडेला आपल्या साथीदारांसह आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहिले.

न्यायाधीशांनी निर्णय दिला, “तुम्ही गुन्हेगार नाही त्यामुळे तुमची सुटका करण्यात येत आहे.”

ते ऐकून अविश्वासाने सर्वांनी एकमेकांकडे पाहिले. आनंदित होऊन त्यांनी कोर्टाचा निरोप घेतला. पण त्यांचा हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. एएनसी ही बेकायदेशीर संघटना आहे असा छाप मारून सरकरने त्यावर बंदी घातली. त्यावर हार मानतील तर ते मंडेला कसले! ते भूमिगत झाले आणि वेश बदलून ते फिरत होते.”





“गोरे लोक आफ्रिकन लोकांना वेगळ्या वंशाचे समजतात. ते त्यांना त्यांच्यातले एक मनात नाही. त्यांना हे समजत नाही की काळ्या माणसांनाही भावना असतात. तेही त्यांच्यासारखेच प्रेमात पडतात. त्यानांही बायकापोरे असतात. त्यांच्या कुटुंबाच्या अन्न, पाणी, वस्त्र, निवारा ह्यासाठी पैसे लागतात. त्यानाही वाटते की आपल्या मुलांनी शाळेत जावे. घरकाम करणारा किंवा मजूर मुलगा किंवा माळीकाम करणारा मुलगा कधीतरी शाळेत जाण्याचे स्वप्न बाळगू शकतो का?”

“परंतु न्यायधीशांवर त्यांच्या बोलण्याचा काहीही परिणाम झाला नाही. त्यांनी मंडेलांना जन्मपेठेची शिक्षा सिनावली.”

“तब्बल अठ्ठावीस वर्षे त्यांना तुरुंगात ठेवण्यात आले. आपल्या बायको-मुलांना ते क्वचितच भेटू शकत. परंतु दक्षिण आफ्रिका आणि जगातील लोक मात्र त्यांना विसरले नव्हते. वस्त्यांमध्ये दंगली झाल्या. पोलीस आणि आर्मीचा फौजफाटा कामाला लागला होता. ते आंदोलकांवर गोळीबार करायचे. त्यांना तुरुंगात डांबायचे. सगळीकडे लोक नेल्सन मंडेलांनी प्रेरित झाले होते. दक्षिण आफ्रिकेतील सामानावर तसेच खेळाच्या संघावर उर्वरित जगाने बहिष्कार घातला होता. १९८० साली एकदाचे गोऱ्या दक्षिण आफ्रिकन सरकारचे डोळे उघडले. नेल्सन मंडेलांची सुटका केली नाही तर बिनाशाला सामोरे जायला लागेल हे त्यांना कळले.

"आणि उद्या.., सोयाबोंगा," काकांनी मोठ्या अभिमानाने सांगितले. "ज्या दिवसाची आपण अनेक अनेक वर्षे वाट पाहत आहोत..."

सोयाबोंगाला खूप थकल्यासारखे वाटले.

उद्या..त्याच्या मनात परत विचार आला, उद्या.....

उद्याचा दिवस खरंच चांगला असेल का? उद्या त्याला डॉ. होपना सामोरे जायचे होते. कदाचित त्याची व काकांची नोकरीही जाऊ शकणार होती.



प्रकरण ६

आधीचे दिवस संपले



"सियाबोंगा, लवकर ये. लवकर घरात ये."

क्रिस खूप उत्साहाने हवेत हात हलवत जोरजोरात ओरडत होता.

सोयाबोंगाला अघटीत घडेल ह्या कल्पनेने खूप भीती वाटली. त्याची त्याच्या कोरडी पडली. नोकरीवरून काढून टाकले हे कुठल्या तोंडाने घरच्यांना सांगायचे?


"आत जा. माझे बाबा दिवाणखान्यात बसले आहेत." क्रिसने सोयाबोंगाला अक्षरशः ओढले. त्याला घरी सहसा कधी बोलवत नसत. त्याने पाय पुसले आणि पुढच्या दाराच्या दिशेने चालू लागला.

सोयोबोंगा दिवाणखान्यात आला तेव्हा कोपऱ्यात टीव्ही सुरु होता. स्क्रीनवर मोठा जमाव दिसत होता आणि ते सगळे डोळे ताणून लांबून धुळीच्या रस्त्यावरून येणाऱ्या दोन कृश आकृत्यांकडे पाहत होते.

विषण्ण मनाने डॉ. होपनी सोयाबोंगाकडे पाहिले. “ते बघ, नेल्सन मंडेला आणि त्यांची बायको विनी.”

त्यांनतर त्यांनी काहीतरी सांगायचे आहे ह्या विचाराने थेट सोयाबोंगाकडे पाहिले. “काल मी तुझ्यावर खूप ओरडलो त्याबद्दल मला माफ कर. नक्की काय झाले ते क्रिसने मला सांगितले आहे. तू इथे काम करायला राहू शकतोस.”

टीव्हीच्या स्क्रीनवर दिसत होते की नेल्सन मंडेला तुरुंगाच्या दारापर्यंत पोचले आहेत आणि सर्व जमाव एएनसीचे ‘निकोसी सिकेलेल आफ्रिका’ हे राष्टगीत एकसुरात म्हणत होते.



डॉ. होप आता सियाबोंगाला नाही तर स्वतःशीश पुटपुटत म्हणाले, "जे काही ह्याआधी झाले...जे काही आतापर्यंत झाले त्याबद्दल मला माफ कर."

सियाबोंगा टीव्हीकडे एकटक पाहत राहिला. अठ्ठावीस वर्षांच्या कैदेनंतर नेल्सन मंडेला म्हातारे झाले होते. सियाबोंगाला कुणीतरी तरुण लढवय्या असेल असे अपेक्षित होते.

इतका त्रास झेलूनही मंडेला हसत होते. तुरुंगातून सुटका झाली त्याचे ते हसू नव्हते तर त्यांना कळून चुकले होते की आता बदलाची सुरुवात झाली आहे. हा बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी स्वत:चे सारे आयुष्य वेचले होते.



प्रकरण ७

नव्या दक्षिण आफ्रिकेची सुरुवात



रविवार दिनांक ११ फेब्रुवारी १९९० ला नेल्सन मंडेलांची तुरुंगातून सुटका झाली. त्यावेळी ते एकाहत्तर वर्षांचे होते तरीही काटक होते.

सुटकेच्या पुढील महिन्यात त्यांनी राष्ट्राध्यक्ष एफ. डब्लू. द क्लर्क ह्यांची भेट घेतली. प्रत्येक नागरिकांने मतदान करून सरकार निवडावे असे ठरले. वर्णभेद नष्ट झाला. दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात प्रथमच १९९४ साली खुल्या लोकशाही निवडणुका झाल्या. त्यात नेल्सन मंडेला ह्यांची नवीन राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली.



दक्षिण आफ्रिका, फेब्रुवारी १९९०: सियाबोंगा आणि त्याचे काका जोशुवा एका श्रीमंत गोऱ्या कुटुंबासाठी काम करीत. त्यांना तिथे नियमित पगार मिळत असे परंतु त्यासाठी त्यांना रोज खूप तास काम करावे लागे. त्यांची राहण्याची सोय एका खराब झोपडीत केली होती. सियाबोंगाला आठवतंय तेव्हापासून अशीच परिस्थिती होती. परंतु उद्या काळ्या लोकांचे महान नेते, नेल्सन मंडेला ह्यांची तुरुंगातून सुटका होणार होती. सियाबोंगा आणि त्याचे इतर काळे बांधव त्यामुळे खरेच मुक्त होतील का?